# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी : ०२२-२२०२६५४९, २२८३५२४७,२२०२५३५४
ई-मेल : ms.mjp2022@gmail.com, mjpcao@gmail.com


जा.क्र.मजीप्रा-२०२१/कावकाअ/करार पध्दती/३४/आ-१ / ५४२ दिनांक :- १० /०२/२०२५

प्रति,

सहाय्यक संचालक (जाहिरात),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई

विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या उप अभियंता (स्थापत्य) यांची सेवा विवक्षित कामासाठी करार पध्दतीने घेण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या उप अभियंता (स्थापत्य) यांची सेवा विवक्षित कामासाठी करार पध्दतीने घेण्यासाठी जाहिरात सुचना क्र.२ सन २०२४-२५ सोबत पाठविण्यात येत आहे. सदरची जाहिरात सर्वात जास्त खपाच्या राज्यस्तरीय प्रसिध्द होणाऱ्या एका दैनंदिन मराठी वर्तमानपत्र व एका इंग्रजी वर्तमानपत्रात ९.५ x ६.०० चौ.से.मी. आकारातच एकदाच प्रसिध्दी देणेविषयी विनंती आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कार्यालयाचे नांव | : | मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, नवी मुंबई |
| २) | वृत्तपत्रात सविस्तर सूचना प्रसिध्द होण्याचा दिनांक | : | १२ .०२.२०२५ |
| ३) | प्रसिध्दी कोणत्या स्तरावर आवश्यक आहे | : | राज्यस्तरीय |
| ४) | जाहिरातीचे देयक कोणाकडे पाठवावयाचे आहे | : | मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर नवी मुंबई |

जाहिरातीचे देयक (जाहिरातीसह) जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर आठ दिवसांत वर नमुद केलेल्या कार्यालयात पोहोचेल अशा प्रकारे आपल्या स्तरावरुन कळवावे.

सोबत :- जाहिरात सुचना

(गजानन गुरव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

प्रत :- उप अभियंता (आयटी सेल), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन बेलापूर, नवी मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

सोबत जोडलेली जाहिरात सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन या कार्यालयास उलट टपाली अवगत करावे.

सोबत :- जाहिरात सूचना व अर्जाचा विहीत नमुना

प्रत :- कार्यालयीन सूचना फलक.

| म.जी.प्रा. नवी मुंबई | |
|---|---|
| उप अभियंता | १२/२ |
| शाखा | आय.टी. सेल |
| आवक क्र. | |
| दिनांक:- | |

सरीता for publish.
Recd
12/2/25

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

### संक्षिप्त जाहिरात सुचना क्र. २ सन २०२४-२५

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष, मुंबई येथील कार्यालयात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या उप अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील अभियंत्यांची विवक्षित कामासाठी १ वर्षाकरिता करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. याबाबतचा सविस्तर तपशिल https://mjp.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-

मुख्य प्रशासकीय अधिकारी

--------------------------- ९.५ ---------------------------

MAHARASHTRA JEEVAN PRADHIKARAN

Short advertisement Notic No. 2 for 2024-25

Deputy Engineer (Civil) retired from service of Maharashtra Jeevan Pradhikaran is to be appointed on contract basis for a period of one year in Superintending Engineer, M.J.P.,Central planning, design and monitoring cell, Mumbai. All the details are available on website, https://mjp.maharashtra.gov.in

Sd/-

Chief Administrative Officer

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईट, मुंबई ४०० ०२१

दूरध्वनी : ०२२-२२०२६५४९, २२८३५२४७,२२०२५३५४

ई-मेल : ms.mjp2022@gmail.com, mjpcao@gmail.com

## सविस्तर सूचना क्र.२, सन-२०२४-२५

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष, मुंबई कक्षाकडे अमृत-१/अमृत-२/नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत मुळ/सुधारित नागरी पाणी पुरवठा व जलनि:सारण योजना व महत्वाकांक्षी कालबध्द जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रु.३० कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या मुळ ग्रामीण पाणी पुरवठा योजना व जल जीवन मिशन अंतर्गत प्रगतीपथावरील तांत्रिक बदल होत असलेल्या सर्व सुधारित योजना तपासणीसाठी प्राप्त होतात. तसेच जल जीवन मिशन/अमृत-१/अमृत-२/नगरोत्थान/एसबीएम-२ या कार्यक्रमांतर्गत योजनांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीच्या संनियंत्रणाची कामे सोपविण्यात आलेली आहेत.

मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष, मुंबई या कार्यालयास प्राप्त होणारे जल जीवन मिशन अंतर्गत तांत्रिक बदलामुळे सुधारित ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव तपासणी करणे तसेच अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष, मुंबई यांनी सोपविलेली कामे करणेकरीता सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्ती करावयाची असून सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्त सेवानिवृत्त उप अभियंता (स्थापत्य) यांना मासिक पारिश्रमिक व भत्ते देय राहतील. याकरिता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या व उपरोक्त कामाचा अनुभव असलेल्या इच्छूक उप अभियंता (स्थापत्य) यांचेकडून विहित नमुन्यात विवक्षित कामाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहे.

२. सदर अर्ज 20 फेब्रूवारी, २०२५ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर नवी मुंबई -४००६१४ या पत्त्यावर पाठवावेत. यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

३. अटी व शर्ती :-

१. सदर नियुक्ती ही सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येईल.

२. अर्जदार सेवानिवृत्त उप अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील असावेत.

३. वर नमुद केल्या कामाचा किमान ३ ते ५ वर्षाचा अनुभव असावा.

४. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५. उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६. कामाचे ठिकाण मुंबई येथील असल्यामुळे उमेदवार मुंबई/ठाणे/पालघर/रायगड जिल्हयातील राहणारा असावा.

७. आवश्यक असलेली अर्हता धारण करणाऱ्या इच्छूक सेवानिवृत्त उप अभियंता यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

८. इच्छूक उमेदवारांनी अर्ज वर नमुद केलेल्या कालावधीच सादर करावेत.

९. प्राधिकरणास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त उप अभियंता यांनी अर्ज सादर केल्यास, अशा अर्जाचा विचार करता येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही अथवा त्या अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

१०. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवाराची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबत संपुर्ण अधिकार प्राधिकरणास राहतील.

११. करार पध्दतीने नियुक्त केलेल्या सेवानिवृत्त उप अभियंता (स्थापत्य) यांना अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष, मुंबई यांचे नियंत्रणाखाली काम करावे लागेल. व त्यांचेकडे कामकाजाचा अहवाल दरमहा सादर करावा लागेल.

१२. इतर अटी व शर्ती हया सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे लागू राहतील.

(गजानन गुरव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

अर्जाचा नमुना

सेवानिवृत्त उप अभियंता (स्थापत्य) यांना विवक्षित कामाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

| अर्जदाराचा अलिकडील काळाचे छायाचित्र |
|---|

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपुर्ण नांव | :- |
| २. | अर्जदाराचा पत्ता | :- |
| ३. | भ्रमणध्वनी क्रमांक | :- |
| ४. | जन्मदिनांक व वय | :- |
| ५. | सेवानिवृत्त झाल्याचा दिनांक व कार्यालय (सोबत आदेशाची प्रत जोडावी.) | :- |
| ६. | सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम | :- |
| ७. | प्राधिकरणास आवश्यक असलेली अर्हता आहे किंवा कसे | :- |
| ८. | मुळ निवृत्ती वेतन (निवृत्तीवेतन मिळत असलेल्या आदेशाची प्रत जोडावी.) | :- |
| ९. | शैक्षणिक अर्हता | :- |
| १०. | अनुभव | :- |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सविस्तर जाहिरातीमध्ये नमुद केलेली कामे व संबंधित नियंत्रण अधिकारी यांची सुचविलेली कामे इत्यादी कामे करण्याकरीता तसेच सदरील कामे करण्याकरीता कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त उप अभियंता (स्थापत्य) यांची करार पध्दतीने १ वर्षासाठी करावयाच्या नियुक्तीची जाहिरात/सुचना मी काळजीपुर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील/सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

(अर्जदाराची स्वाक्षरी व नांव)